**BDC LIBRARY**

**News Paper Clipping**

**A.Y. 2025-26**

# विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात नाव कमवावे : डॉ. दीपक डांगे

**कराड : पुढारी वृत्तसेवा**

क्रीडा क्षेत्रातून विद्यार्थ्यांना कारकीर्द करण्याची संधी उपलब्ध आहे, विद्यार्थ्यांनी उत्तम प्रशिक्षकांच्या सहाय्याने आपल्या सुप्त क्रीडा गुणांना वाव देऊन विविध स्पर्धा खेळाव्यात व क्रीडा क्षेत्रात नाव कमवावे. जीवनात जन्मदात्री, आपली शाळा व आपला देश यांना प्राथमिकता देऊन मार्गक्रमण करावे, असे प्रतिपादन पाटण येथील बाळासाहेब देसाई कॉलेजचे क्रीडा संचालक डॉ. दीपक डांगे यांनी केले.

शिक्षण मंडळ, कराड संचालित टिळक हायस्कूलमध्ये माजी विद्यार्थी ऑलम्पिकवीर खाशाबा जाधव यांच्या जयंतीनिमित्त व राज्य क्रीडा दिनाच्या औचित्या साधून आयोजित वार्षिक शालेय क्रीडा पारितोषिक वितरणप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाची सुरुवात क्रीडा ज्योत प्रज्वलित करून व ऑलम्पिकवीर खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. स्वागत गीत संगीत शिक्षिका संगीता काणे, मकरंद किर्लोस्कर व विद्यार्थ्यांनी सादर केले.

प्रास्ताविक व अतिथींचा सत्कार मुख्याध्यापक किसन वाघमारे यांनी केला. परिचय क्रीडा विभाग प्रमुख जीवन थोरात यांनी करून दिला. कार्यक्रमाच्या निमित्ताने तयार केलेल्या विशेष भित्तिपत्रकाचे प्रकाशन प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आले. पारितोषिकांच्या यादीचे वाचन क्रीडा शिक्षक गोविंद पवार यांनी केले.

विद्यार्थ्यांना विविध क्रीडा पारितोषिकांचे वितरण प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आले. पर्यवेक्षक पंडित मोरे यांनी आभार मानले. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी,. विद्यार्थी व पालक उपस्थित होते.